धर्मराज्य पक्ष

अध्यक्ष
राजन राजे

संदर्भ क्र.________ दिनांक : १३/०८/२०१४

# प्रसिध्दीसाठी

## सतीश शेट्टी आणि नरेंद्र दाभोळकर खूनाच्या तपासासाठी न्यायालयीन 'एसआयटी' नेमण्यात यावी- राजन राजे

प्रतिनिधी/ठाणे

दि. १३ – माहिती अधिकार कार्यकर्ते सतीश शेट्टी आणि नरेंद्र दाभोळकर यांच्या खूनाच्या तपासासाठी न्यायालयाने हस्तक्षेप करून **'एसआयटी'** (स्पेशल इन्वेस्टिगेशन टीम) नेमावी अशी मागणी **'धर्मराज्य पक्षा'**चे अध्यक्ष **राजन राजे** यांनी केली आहे.

सतीश शेट्टी आणि नरेंद्र दाभोळकर यांच्या खूनाच्या तपासात होत असलेल्या हेळसांडीबाबत आयोजित **'पत्रकार परिषदे'**त राजन राजे बोलत होते. यावेळी **'धर्मराज्य पक्षा'**चे महासचिव अनिल ठाणेकर, राजू फणसे, उपाध्यक्ष राजन सावंत, खजिनदार जयेंद्र जोग, ठाणे जिल्हा सचिव नरेंद्र पंडित, धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघाचे महासचिव महेशसिंग ठाकूर, सचिव रूपेश पवार आदी पदाधिकारी उपस्थित होते.

माहिती अधिकार कार्यकर्ते सतीश शेट्टी यांचा १३ जानेवारी-२०१० रोजी तळेगाव येथे खून करण्यात आला होता. या प्रकरणाचा तपास सीबीआयकडे देण्यात आला. परंतु चार वर्षानंतर अचानक **'सीबीआय'**ने या खटल्याचा **'क्लोजर रिपोर्ट'** न्यायालयात सादर केला आहे. यामुळे या प्रकरणातील गुन्हेगार सापडण्याची शक्यता मावळली आहे. शेट्टी प्रकरणात **'आरआयबी'**चे विरेंद्र म्हैसकर यांच्यावर शेट्टी यांच्या खूनातील सहभागाबाबत आरोप केला जात आहे. विरेंद्र म्हैसकर हे विद्यमान केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे व्यावसायिक भागीदार आहेत. अशावेळी सीबीआयने खटल्याचा तपास बंद करण्यामागे सत्ताधारी नरेंद्र मोदी सरकारचा हात असल्याचे बोलले जात आहे. याचप्रमाणे अंधश्रध्दा निमूर्लन समितीचे कार्याध्यक्ष डॉ. नरेंद्र दाभोळकर यांच्या खूनाला वर्ष होत असतानाही पोलीसांना आरोपी सापडत नाहीत. उलट पोलीस **'प्लँचेट'** प्रकरणात गुंतलेले दिसतात. यामागेही सत्ताधारी काँग्रेस-राष्ट्रवादी आघाडी सरकार जबाबदार असल्याचे निष्पन्न होत आहे. यामुळे सतीश शेट्टी आणि नरेंद्र दाभोळकर यांच्या खून प्रकरणाचा तपास करण्यासाठी न्यायालयाच्या देखरेखीखाली 'एसआयटी' गठीत करण्यात यावी, अशी विनंती

भारताचे राष्ट्रपती, सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती आणि महाराष्ट्राचे राज्यपाल यांना **‘धर्मराज्य पक्ष’** करणार आहे, अशी माहिती **राजन राजे** यांनी दिली.

सतीश शेट्टी आणि नरेंद्र दाभोळकर यांच्या खूनप्रकरण दडपण्याचा विरोध करण्यासाठी आणि **‘एस्‌आयटी’** गठित व्हावी यासाठी स्वातंत्र्याच्या पूर्वसंध्येला गुरूवारी, १४ ऑगस्ट-२०१४ रोजी शासकीय विश्रामगृह येथे केंद्रातील नरेंद्र मोदी सरकारचा आणि राज्यातील काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेस आघाडी सरकारचा धिक्कार करण्यासाठी सकाळी ११ ते ५ यावेळी **‘निषेध धरणे आंदोलन’** करण्यात येणार आहे. तसेच रविवारी, २४ ऑगस्ट-२०१४ रोजी **‘निषेध परिषद’** आयोजित करण्यात आल्याची माहितीही **राजन राजे** यांनी दिली.

**‘धर्मराज्य पक्षा’तर्फे ‘सार्वजनिक गणेशोत्सव सजावट स्पर्धा’**

**‘धर्मराज्य पक्षा’**तर्फे यावर्षीपासून ठाणे, नवी मुंबई, डोंबिवली, कल्याण, उल्हासनगर आदी ठिकाणी **‘पर्यावरण-संरक्षणासाठी आणि अन्याय, भ्रष्टाचार तसेच शोषणाविरूध्द जनजागृती’** या विषयांतर्गत **‘सार्वजनिक गणेशोत्सव सजावट स्पर्धा’** आयोजित करण्यात आली आहे, अशी माहितीही राजन राजे यांनी यावेळी दिली.

तसेच दहिहंडीबाबत १८ वर्षाखालील मुला-मुलींना गोविंदा पथकांत सहभागी करून येण्यास व दहिहंडी फोडण्यासाठी २० फुटांहून जास्त उंचीचे मानवी थर लावण्यास बंदी घालण्याचे न्यायालयाने दिलेले आदेश, तसेच आवाजाची मर्यादा पाळण्याचे ठाणे पोलीसांनी दिलेले आदेश यांचे **‘धर्मराज्य पक्षा’**ने स्वागत केले आहे. याबाबत दहिहंडी मंडळांनी न्यायालयाच्या आदेशाचे पालन करावे आणि कायदा-सुव्यवस्था कायम राखावी असे आवाहन करून न्यायालयाच्या आदेशाचे पालन न करणाऱ्या राजकीय पक्षाच्या पदाधिकाऱ्यांना तुरूंगाचा रस्ता दाखवावा, असे आवाहन **राजन राजे** यांनी केले आहे.